म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९९९.

...बोध नाटक मंडळी

# असुरी लालसा

अंक १ ते ३

पद्यावली.

REFBK-0019513
REFBK-0019513

किंमत ४ आणे.

क्रमांक ६५५

# प्रस्तावना.

कोणतेंही पुस्तक—मग तो ५०० पानांचा प्रचंड ग्रंथ असो, अगर ५ पानांचें छोटेसें पुस्तक असो...त्याला प्रस्तावना ही आवश्यक असते. त्यांतल्यात्यांत एखाद्या नवीन धारसारणीच्या प्रयत्नाला तर प्रस्तावना अत्यावश्यक असते. कारण त्या अभावीं या लेखानी कृतीबद्दल रसिकांना वेगवेगळ्या शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे! प्रसिद्ध आंग्लनाट्यकार शेरीडन् याच्या कृती पाश्चात्यराष्ट्रांत किती लोकप्रिय आहेत, त्याचें तात्पुरतें वर्णनही करतां येणें अशक्य आहे. आमच्या सुशिक्षित वर्गाला त्याच्या लोकप्रियतेचें वेगळें वर्णन आवश्यक नाहीं. यांच जगप्रसिद्ध नाटककाराच्या महोत्तम 'पिझारो' या नाट्यकृतीवरून सदर नाटक सुमारें २० वर्षांपूर्वी प्रसिद्ध उर्दू नाटककार हश्र यांनीं प्रथमतः 'असिरे हिर्स' या नांवानें विनोद वगैरे मिश्र करून तयार केलें व तो त्यांचा प्रयत्न इतका लोकप्रिय झाला आहे की हल्लीसुद्धां 'असिरे हिर्स' नाटकाला प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी लोटतात व अशा अत्यंत यशस्वी म्हणूनच लोकप्रिय नाटकावरून सदर कृती थोड्याशा अत्यावश्यक फेरफारांसह आम्ही मराठी रंगभूमीवर आणित आहों. त्याच त्या पद्धतीनें नटविलेली, केव्हां केव्हां एकप्रकारच्या सारखेंपणानें कंटाळवाणी वाटणारी नाट्यसृष्टी, करमणूक व स्वभावाला अवश्यक गुणांचें योग्य प्रतिबिंब दाखविणें, या दोन उद्देशानें थोडीशी बदलण्याचा प्रयत्न करण्यांत आम्ही "कांहीं तरी 'चेंज' पाहिजे" म्हणणाऱ्या लोकांना कांहीं तरी चेंज दाखवित आहोंत असें वाटल्याविना राहणार नाहीं. कित्येक नाटककाराप्रमाणें, नाटक हें दमूनभागून चार घटका मनोरंजनाकरितां आलेल्या प्रेक्षकांच्या डोक्याला करमणुकीपेक्षां श्रम देण्याकरितां आहे असें आम्हास वाटत नसल्यामुळें, यांत इतर गोष्टीपेक्षां **मनोरंजन** हाच उद्देश प्रधान मानण्यांत आला आहे! प्रस्तुत नाट्यबालक महाराष्ट्र रंगभूमीच्या अंकावरच खेळणार आहे. व तें आपल्या मोहक लीलांनीं महाराष्ट्रीय प्रेक्षकांचें चांगल्या प्रकारानें मनोरंजन करील असा आम्हांस दृढ भरंवसा आहे. आपल्या मोहक व जोमदार लिलांनीं एका दुसऱ्या रंगभूमीवर हजारों रसिकांना रिझविणारें हें नाटक कर्णमधुर संगीताच्या सुरांत, रसिकांना रमविण्याचा प्रयत्न करणार. व प्रेक्षकांनीही या मुख्य गोष्टीचा विचार करून नाटक अवलोकन केल्यास, त्यांना हा एक प्रकारचा शक्य त्या सोयींनीं व श्रमानें केलेला बिनमोल नवीन प्रयत्न आहे असेंच वाटेल. हिंदुस्थानच्या उष्ण हवामानामुळें एखाद्या युरोपिन गृहस्थानें कोटपॅंटच्या ऐवजी आमच्या इकडील पोषाख वापरला असतां तो जसा

हिंदी होऊं शकत नाहीं अगर एखाद्या हिंदी मनुष्यानें तिकडील हवामानाकरितां पाश्चात्य पोषाख केला तर तो जसा युरोपियन मानला जात नाहीं तद्वतच नांव व भाषा बदलल्यानें, थोड्याशा अत्यावश्यक फेरफारानें ही कांहीं अस्सल मराठी कृती मानण्याचें कारण नाहीं. अर्थात 'या नाट्यबालकाच्या कपाळावर गंधच नाहीं,' 'याचे आचार विचार वेगळेच दिसतात' व 'हें आपल्या इकडील मुलाप्रमाणें दिसत नाहीं' अशा शंका प्रेक्षकांना येण्याचें कारणच उरलें नाहीं. शिवाय त्याला आमचें वळण लावता आलें नसतें असें नव्हें, परंतु परकीय कथानकाची, प्रवेशवारीची, पात्राच्या स्वभाव परिपोषाची, विनोदाची पद्धती मराठा प्रेक्षकांस पसंत पडेल असें वाटल्यावरून हें बालक आम्हीं सहृदय प्रेक्षकांसमोर उभें करीत आहोंत, त्यांत कथानकाच्या पद्धतीला वेगळेंच वळण लागलें, महाराष्ट्र रंगभूमी भ्रष्ट केली, मराठी व्यवहारपद्धतील हें विसंगत आहे असें कोणास वाटण्याचें मुळीं कारणच नाहीं. इतर रंगभूमीवरील पात्रांची कथानकाची, सीन्स वगैरे करण्याची जी उत्कृष्ट पद्धती वाटली ती मराठी रंगभूमीवरील उत्कृष्ट गायनासह पूर्णालंकृत करून आम्हीं आज प्रेक्षकांसमोर सादर करीत आहोंत. ती त्यांना नवीन दृष्टीनें पसंत पडो अशी त्या जगन्नायकाजवळ प्रार्थना आहे.

आतां राहिलें काम आभार प्रदर्शनाचें! वास्तवीक पाहतां खालील व्यक्तींपैकीं कित्येक व्यक्तींनीं सदर प्रकाशकास इतकें अमोल सहाय्य केलें आहे कीं, त्याबद्दल त्यांचें नुसतें आभार मानून मुळींच चालणार नाहीं. त्यांतल्यात्यांत लक्ष्मी व अपॉलो सिनेमाचे उदार मालक यांनीं थिएटर जागा वगैरे शक्य त्या प्रकारची मदत सढळ हातानें करून सदर प्रकाशकास कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. त्यांच्या सहानुभूतीच्या अभावीं सदर प्रयोग रंगभूमीवर आणणें जवळजवळ अशक्य झालें असतें, तसेंच आर्यसुबोध नाटक मंडळीचे डायरेक्टर मि. बी. ए. बेंजामिन यांनीं सतत १० महिनें श्रम घेऊन हा प्रयोग बसविला, रा. गणपतीबुवा भिलवडीकर यांनीं कित्येक पद्यांच्या चाली देऊन पदेंही बसवून दिलीं (यांतील कित्येक चाली मूळ नाटकांतीलच ठेवल्या आहेत) व श्रीयुत भालचंद्र गोपाळ पेंढारकर आर्यसुबोध नाटक मंडळीचे नाटककार यांनीं सदर प्रकाशकाच्या इच्छेनुसार नाटक व पद्यें तयार करून दिलीं याबद्दल वरील सर्व गृहस्थांचा प्रकाशक फार आभारी आहे! शेवटीं आ. सु. ना. मंडळीतील नटांनीं व नाचमास्तर रा. बाबूराव गुजर यांनीं उल्हासानें व हौसेनें सतत श्रम घेऊन हें नाटक वठविलें ह्याबद्दल त्यांचे व ज्या अनेक सद्गृहस्थांचीं नांवें देतां आलीं नाहींत त्यांचें आभार मानून ही बरीच लांबलेली प्रस्तावना पुरी करतो.

प्रकाशक.

# प्रस्तुत व मूळ नाटकांतील पात्रें.

१९५१३
REFBK-0019513
REFBK-0019513

| मराठी. | इंग्लिश. |
|---|---|
| रणधीर (सुवर्णदेश-सम्राट.) | एलाँजो. |
| प्रताप (रणधीराचा स्वामिभक्त सेनापती) | रोलो. |
| चंडवर्मा (रणधीराचें राज्य अन्यायानें गिळंकृत करणारा त्याचा चुलतभाऊ) | पिझारो |
| भवानीशंकर (रणधीराचा एक शूर, वृद्ध सरदार) | ऑरोजँबो. |
| मूर्खोजीराव (चंडवर्म्याच्या दरबारांतील एक खुषमस्कऱ्या सरदार) | (नवीन पात्र) |
| चंद्रराव (मूर्खोजीचा मुलगा व चंद्रिकेचा प्रियकर) | (नवीन पात्र) |
| सांवळ्या (चंद्रिकेचा वात्रट नौकर) | (नवीन पात्र) |
| अनंगकुमार (रणधीराचा मुलगा) | मास्टर-एलाँजो. |

| | |
|---|---|
| बळ्या<br>( सांवळ्याचा नाटकी भाऊ ) | ( नवीन पात्र ) |
| ललित<br>( सुवर्णदेशाची सम्राज्ञी ) | कोरा |
| सत्यवती<br>( चंडवर्म्याची निस्पृह पत्नी ) | एलविरा |
| चंद्रिका<br>( एक स्वतंत्र सावकार कन्या व चंद्ररावाची प्रणयिनी ) | ( नवीन पात्र. ) |
| वेडाताई<br>( मूर्खोजीची बायको ) | ( नवीन पात्र ) |

शिवाय शिपाई, दासदासी, सख्या, नर्तकी वगैरे वगैरे.

स्थळः—सुवर्ण देश.

# असुरी लालसा.

## अंक पहिला.

### ईशस्तवन.

पद्य १ लें.

दीनानाथा मोहे भ्रमलों तारी कुरारी करुणानिधाना । रक्षी भव दुःखातें निवारी ॥ धृ० ॥ करवी पार, भय अपार, जगप्रभो ॥ धृ० ॥ इश तव नाम निशिदिनी पतीतासी देतसें आराम पवित्र तवची ध्यान नुरवील पाश । माते देई मुक्ती सोडवी हा संसार । गमत असार, भ्रमवी अपार, गमे निराधार । दावी सत्पथ देई सुमती नच, कोणी आधार, दुरिताते संहारी । तारी कूरारी ॥ धृ० ॥

## प्रवेश पहिला.

स्थळ—छावणीजवळील धबधबा.

ईशस्तवन झाल्यानंतर सख्या गात रम्य वनश्री पहात असतां सत्यवती प्रवेश करते, मैत्रीणि तिच्या सौंदर्याची स्तुति करून तिची थट्टा करीत असतात, इतक्यांत तिच्या वाढदिवसानिमित्त चंडवर्मा तिला एका मृतवीराचें शीर त्याच्याच बंदिवान पित्याच्या डोकीवर देऊन पाठवितो. त्या वृद्धाच्या स्थितबिद्दल दया येऊन सत्यवती त्याला सोडून देतें. चंडवर्मा प्रवेश करतो; सत्यवती त्याला आपली दुष्टवृत्ती सोडून सन्मार्गावलंबनाची प्रार्थना करते, पण तो तिला झिडकारतो आणि एका सेवकास त्या वृद्धाला पुन्हां पकडून आणण्याची आज्ञा देतो, सत्यवतीला आपल्या पतीच्या दुष्ट कृत्यांचा तिरस्कार वाटून ती त्याला हरप्रयत्नानें त्यापासून परावृत्त करण्याची प्रतिज्ञा करतें.

### पद्य २ रें.

१ ली सखी:—

बहार आली ही अमुप सर्व विश्वा शोभा दे ।
विवाहीया द्विजगण हे उषेच्या आलाप मंजुल घे ॥१॥

२ री सखी:—

धवल जलबिंदु हे चमकदार रवितेजें खुलती ।
वनश्री कंठी दीं, मोत्यांची माला मनोहर ती ॥२॥

३ री सखी:—

अहा भूगिरीवरती मृदुल मखमल पसरोनी ।
फुले कलिका भुले दुनिया कशी भ्रमरावली भुलली ॥ ३ ॥

### पद्य ३ रें.

सख्या:—

चालत चपलही चंचल चाल येई ही सुकुमारी ॥ धृ० ॥ उन्नत वक्षस्थलही शोभे। नेत्र आनंदानें भरले ॥ मोद वर्षत देवी आली ॥ बहु मोद वर्षत देवी आली ॥ धृं० ॥ नेत्र ते हरिणा लाजविती कपोल जेवि गुलाब । रूप तुझें हें मोहवी । इंदू सोडी अभिमान ॥ अहाहा राजाची कांता । अहाहा दीनांची माता। येत सुंदर अन्नदात्री ॥ आली ॥

### पद्य ४ थें.

३ री सखी:—

मन शांतवितो चंद्र जसा सौख्य दे सकलां ।
मुखचंद्र हा तैसाच गमे गौरही आपुला ॥
सौंदर्ययुता भामिनी या लोकिं बहुतशा ।
परि आपुल्या सुरूपगुणा साम्यता न अशा ॥ धृ० ॥

### पद्य ५ वें.

सत्यवतीः–

कैसें भासें अतुल हें स्वरुप न कळे केविं ।
जगतीं या असती सरस अनेक यासी ॥
हृदयीं मम गे बाई । अभिमान ना कांहीं ।
अभिमानी दुखांकुर उद्भवे कीं सुख दूर ॥
आणि ध्यानीं नावमानि तरी जाई दुःख दूरी ॥ धृ० ॥

### पद्य ६ वें.

सत्यवतीः–

जें हृदयीं पूजिलें म्यां उलट छळी मज जाच हो । मानिलें ज्या ईश्वरसे खलाचा अवतार तो । पदरीं पडे मी कीं निष्ठुराच्या । जगीं मम जीवन वाटे फुकें या । असुरीवृत्ती परराज्यतृष्णा । कुमनीं तयाच्या वाटे भलीं कीं ॥ धृ० ॥ व्यर्थ जनाला हा पिडवी छळवी । स्वकुलाच्या विमल यशा मळवी । शुभारी सज्जनांची शीरें छेदी । क्रूरकर्मीं स्वमनातें रिझवी । अति या कृतीनें हें मन पोळें । पल पल मम हृदयीं शोक भरे ॥ धृ० ॥

---

### पद्य ७ वें.

सख्याः–

चला जाऊं सखेगे आतां गेही । नृपराज येई । नृप येई सखेगे नृप येई ॥ धृ० ॥ आतां पहा कशी चंचला ही । अधिरतेनें पाही । कशी उत्सुक ही । तव जाई पाही प्रियकरा ॥

सत्यवतीः–

असें नच बोला । न शोभे तुम्हाला । बहु राग येई हृदीं लाज बाई ॥ सखेगे नृप येई ॥ धृ० ॥

---

पद्य ८ वें.

सत्यवती:-

आजि सखी नाथ आले । फेकी आनंदी फवारे । वाटे निशानाथ । वर्षे कीं अमृत । बहु सुखावे ॥ तेवि हा भूपाल भासे ॥ धृ० ॥ दिसती दाहि-दिशा प्रेमरसें रंगेल्या । हातीं घेवोनिया पंचारती वनदेवी आल्या ॥धृ०॥ सखी दिसतें हें सर्व विश्व मोदें भरलेसें । सत्यप्रीति हृदयीं भाव जरी वागतसे । प्रेमप्रभावें । विश्वहीं तरलें ; देवही हरले । असुख नुरलें । आनंदी-आनंद । विश्वही रंगें प्रेमानें ॥ धृ० ॥

---

# प्रवेश दुसरा.

स्थळ—छावणी.

मुर्खोजीराव व चंडवर्म्याच्या सैन्यातील इतर शिपाई एकमेकांशीं विनोद करीत चंडवर्म्याच्या आगमनाची वाट पहात असतात. चंडवर्मा प्रवेश करतो; नाचगायन होतांच सत्यवतीनें बंधमुक्त केलेल्या भवानीशंकराला एक शिपाई घेऊन येतो, चंडवर्मा त्याला लालूच वगैरे दाखवून आपल्या पक्षाला मिळण्याचा उपदेश करतो, पण भवानीशंकर आपल्या बाणेदारपणाला व स्वामिभक्तीला शोभतील अशा उत्तरांनीं त्याची निर्भत्सना करतो. चंडवर्म्याच्या एका सैनीकाला ही त्याची उणी उत्तरें सहन न होऊन तो भवानीशंकरास एकदम पिस्तुल झाडून ठार करतो.

पद्य ९ वें.

सख्या:-

पलपल तन मन धन वारोरी । प्राणप्यारो छलबल वारो । नैननवाकी सैनन वाकी चितवा चुरायो गयो । जादू मोपे डारोरी । पियाके दरसबिन कलन

पडत मोहे । कटत रयन गिन तारोरी । मोरी आली मोरी आली कछू न सुहावे । नयन वाकी आनबान याद आत होवे साथ ॥ लगत कटारी पिया नही टारे टारी पिया कर गयो मोपे डारोरी ॥ धृ० ॥

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळ—मुर्खोजीचें घर.

चंद्रिकेचा वात्रट नौकर सांवळ्या चंद्रावाला निरोप सांगण्याकरितां घरीं येतो. कर्मधर्मसंयोगानें त्याची सहज मुर्खोजीरावाशीं गांठ पडतें, मुर्खोजीच्या मूर्खपणाचा फायदा घेऊन सांवळ्या त्याची बरीच थट्टा करतो व त्याच्या अगोदरच चंद्रिकेवर लुब्ध झालेल्या अंतःकरणांत तिजबद्दल जास्तच कामुकवासना उत्पन्न करून त्याला दुसरें दिवशीं तिच्या घरीं येण्यास सांगतो.

पद्य १० वें.

सांवळ्याः—

अरे वारे वा ह्मातार्‍याचें अंतर बिलंदर निरंतर कैचा हा सरदार । अहा काय हा सौंदर्या आगळा मोहक पुतळा किती मजेदार ॥ मुर्दार सरदार थुक्का फजितीला मानी दारूचा शोकी अनिवार । अरे हा पहा पोटाचा या ढेरा नौबतीचा डेरा हा चेहरा भिकार ॥ वरून वरून ताठा तारुण्याचा परी अवसानाचा नाहीं विचार । अहार विहार चाळे मर्कटाचे स्त्रियासाठीं नाचे हा उल्लू नादान ॥ मुर्दार ॥

---

# प्रवेश चवथा.

## स्थळ—रणधीराचा दिवाणखाना.

सर्व सख्या कुमार अनंगाला रिझविण्याकरितां झुल्यावर बसवून झोकें देत गात आहेत अशा स्थितींत पडदा वर जातो, थोड्याच वेळांत रणधीर येतो, ललितकुमारीचा व त्याचा प्रेमपूर्व विनोद चालू असतां प्रताप सेनापतीच्या व भवानी शंकराच्या मृत्यूचें दुःखदायक वर्तमान सांगतो. रणधीर दुःखीत होतो, पण विवेकानें मन स्थीर करून शत्रूच्या येणाऱ्या हल्लयाला तोंड देण्याकरितां जावयास तयार होतो, ललितकुमारीच्या आग्रहाच्या विनंतीवरून रणधीर तिला बरोबर यावयास अनुमती देतो व निराशेनें प्रतापास 'माझ्या मृत्यूनंतर माझ्या मुलाचा बाप तूं हो' असें सांगतो, अशी ही भयंकर आज्ञा त्या स्वामिभक्त सरदाराच्यानें कशी पाळवेल? पण रणधीर अत्याग्रहपूर्वक एक पत्र त्याच्या हातीं देऊन दुर्दैवानें मी ठार झालोंच तर तूं हें ललितच्या स्वाधीन कर असें सांगतो. स्वामिभक्त प्रताप नाइलाजास्तव ती राजाज्ञा कबूल करतो.

### पद्य ११ वें.

सख्या:—

सखे मोदानें बालक क्रिडत झोला हा ॥ दृ० ॥ मोद कमलवदन देई हें । पहा पहा युवराज । अहा भावी महाराज ॥ धृ० ॥ क्रिडत झोला हा ॥सखे॥ गमें सारीं भूमी ही आनंदीगे । प्रेमें गावोनी युवराजाना सुखवूं या। घेई घेई झोका । दृष्टी ही चंचल कां । जहाले गाल लाल कां । घेई झोका ॥ धृ० ॥

---

### पद्य १२ वें.

ललित:—

प्रिय अनंग मोही हा । सुरम्य सुमुख हें गमे चुंबावें ॥ अमृत स्त्रवें सरिता मोद नाचे प्रेम विहरें मोह विलसे कपोलीं तव या ॥ धृ० ॥ देई देई चुंबन

बाळा ॥ धृ० ॥ हृदयीं अमूप मोद दाटे । नेत्रीं मम प्रेमाश्रु आले । सदा सुखी ईश राखो नाथासह पुत्रा ॥ धृ० ॥

१८५१३

### पद्य १३ वें.

अनंगः—

आई मला इवलीशी बंदूक देगे । बंदूक देगे भाला हवा गे । तरवार मजला हवी गे ॥ बंदूक उडवींन, किल्लाही पाडीन, गोळी मी सोडीन धररर धुडुम ॥ धृ० ॥ चल चल जा, भरभर जा गम्मत गे पहा । गुडुम गुडुम गुडुम । धररर धुडुम धुस् ॥ आई ॥

---

### पद्य १४ वें.

ललितः—

बोला बोला प्रियकरा आता दासी ही विनवीते । बोला बोला जी होय माझी भूल घडे तो अपराध ॥ दासी ही विनवीते ॥

मन मम मातें मुळीं न सांगतसें कोठें अपराध झाला । शिक्षा जी होई माते सिद्ध मी साहूं कशी । न करा कोप प्रिया दासी विनवी ही अशी ॥ धृ० ॥

### पद्य १५ वें.

ललितः—

नाथ चरणी विनती करीत मानावी ती नावमाना । युद्धभूमीं स्थानीं न्या ही जाया ॥ धृ० ॥ पतीविण सारशून्य । सरस जेवि कमलहीन । अबला या मोकलीती । धाय, धाय, धाय, धाय ॥ धृ० ॥

## पद्य १६ वें.

ललितः—

प्रभूराज तारी नाथ भिक्षा मी मागे।
जाती हे युद्धार्थ त्यासी सुयश दे ॥ धृ० ॥
तुजविना ना कोणी आम्हांसी त्राता ।
प्रार्थीत तव चरण । वंदोनी भावें ॥ धृ० ॥

---

# प्रवेश पांचवा.

### स्थळ—चंद्रिकेचें घर.

चंद्ररावाच्या विरहामुळें व्याकूळ झालेली विरहिणी चंद्रिका त्याची आतुरतेनें वाट पहात आहे इतक्यांत सांवळ्या चंद्रराव आल्याची आनंदपूर्ण बातमी तिला सांगतो, प्रणयपूर्ण कोपानें ती प्रथमतः चंद्ररावाचा बराच समाचार घेतें. इतक्यांत मुर्खोजीराव सांवळ्यासह येतो, चंद्रराव लपून रहातो. चंद्रिकेच्या सौंदर्यावर उल्लू झालेला मुर्खोजी तिला खूष करण्यासाठीं बऱ्याच नाटकांतील पाठ केलेली विसंगत भाषणें म्हणून दाखवितो, शेवटीं सांवळ्या चंद्रिकेचा बाप आला असें सांगून, भेदरून गेलेल्या मुर्खोजीस लुगडें नेसवून दळत बसवितों. चंद्रिकेच्या बापाच्या वेषांत चंद्रराव येऊन त्याची पुष्कळ निर्भत्सना करतो व थोड्याच वेळानंतर चंद्रिकेच्या प्राप्तीकरितां जोडे खाणारा मुर्खोजी हळहळत घरीं जावयास निघतो, सांवळ्या सोबत असतोच.

## पद्य १७ वें.

चंद्रिकाः—

मोहन हृदयनाथ जिवास गे श्रांत । करुनि जो विरहात मजला सदा लोटी ॥ धृ० ॥ सकलदिन मज बाई । प्रखर हा विरह दाही । होत होत हृदीं घाव । कटू हाच ध्यास गे ॥ धृ० ॥

---

पद्य १८ वें.

**चंद्रराव**:—

तुही सुखद चतुर बाला । न करी गे कोपा । नोहे सुखेची काल तो जाई । विरही दुःख मजला ॥ तूं गे ममाधार । न तववीण । दिन मम कठत ना। सुखावत ना । येती स्मरणी तवचि वच सुहास्य । विरही या मम मना । मोहबाले । सुमुखी रमणी । मानी मानी ॥ धृ० ॥

---

पद्य १९ वें.

**मूर्खोजी**:—

तूही मम देवी तुही मम देवी तूंही प्रेमें माते मान मान । मानगें, गुलाम गे स्वदासगे । मधु मधु वचे वद वद साचें तव मज लागे ध्यान ।

**चंद्रिका**:—

तव सुखवी वचनीं या जे प्रेम भरे । माते जिंकी प्रेमा तव प्रियनाथा । शोभा तुम्हा ये या वीरवेषें पाहुं कोठें सुरूपा या । नाथ नाथ नाथ ॥धृ०॥

---

## प्रवेश सहावा.

स्थळ:—रणमैदानाजवळील अरण्य.

सम्राट रणधीर भविष्यकालीन युद्धाचें अधिपत्य प्रतापाला देऊन बहुमानार्थ जरीपटका त्याच्या स्वाधीन करतो. प्रतापही आपल्या शूर सैनिकांना सर्व गोष्टींचा व भविष्यकालाचा विचार करून शौर्यानें लढण्याबद्दल प्रोत्साहन देतो; व सर्वजण 'भवानी माता की जय' म्हणून समरभूमीकडे निघून जातात.

---

## प्रवेश ७ वा.

### स्थळ—रणमैदान.

भयंकर रणकंदन चाललें असतां रणधीर थोडयाशा सेवकासह प्रवेश करतो. व चंडवर्म्याच्या बहुसंख्याक लोकांकडून वेढला गेला,, असतांही तो त्यांच्यावर चाल करून जातो, पण प्रतिपक्षाच्या संख्याधिक्यामुळें रणधीर चंडवर्म्याच्या लोकांच्या हातीं सांपडतो, त्याला ते कैद करून नेतात. इतक्यांत सर्वांग शत्रु-रक्तानें न्हालेला वीर प्रताप, भिऊन माघार घेणाऱ्या लोकांवर संतापून येतो. तेथेंच त्याला रणधीर शत्रूच्या हातीं सांपडल्याची बातमी कळते, दुःखांत भर म्हणूनच कीं काय ललिताही पतिशोधार्थ तेथें येते, पतीवधाची भयंकर बातमी ऐकून ती आत्महत्या करणार तोंच प्रताप तिचा हात वरच्यावर धरतो.

**अंक पहिला समाप्त**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—छावणी.

युद्धांत झालेल्या जयप्राप्तीस्तव चंडवर्म्याचे सैनिक आनंदानें मद्यपान करून त्याच्या स्तुतीपर गाणीं गात गात विजयी चंडवर्म्याच्या अभिष्टचिंतनार्थ उभें आहेत असा पडदा उघडतो.

पद्य २० वें.

**सेवकजनः—**

**१ लाः—**

उदधि मंथन श्रमानें लाभली ही मदिराच जी ।
हाती लागली ध्या सुरासुरांना मोही ती ॥

**२ राः—**

प्याला सेवा एक एकचि पेयें या माधुरी ये ।
जगताचें हेचि दृश्य भासें सुंदर पहा खरें ॥

**सर्वजणः—**

कवणें माधुरी लज्जत वदली मदिरेचि ।
नच नच ऐसी मोहक भासे ॥ कवणें ॥ धृ० ॥
असुरांनीं देवांनीं भरभरली पी पी प्याले ।
हीच आनंदा आधार दुःखी मना शमविणार ॥
कैसि दिसतसें रंगेही लाल दिसतां सर्वा मोहविती ।
व्याप नुरविती, मोद वर्षती, काल दुःखा ती ॥

४ था:–

गाति गे तुज येथ सारे जमले गायक प्रेमें आज ।
सर्वही जय जय बोलति तूंही दुरिता दूर कर ॥ धृ० ॥

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ–चंडवर्म्याचा दरबार.

चंडवर्मा येऊन बसतांच नर्तनगायन होऊन सर्व शिपायांबरोबर अभिष्ट चिंतन म्हणून मुर्खोजीरावही आपल्या नांवाला साजेल असेंच कांहीं तरी बडबडतो. शिपाई बंदिवान रणधीराला घेऊन येताच चंडवर्मा त्याची निर्भत्सना करण्याचा प्रयत्न करतो, पण शेवटीं रणधीराच्या बाणेदार, मर्मभेदक वाग्बाणांनीं क्रोधायमान होऊन तो रणधीराला दुसरें दिवशीं प्रातःकालापुर्वीच ठार करण्याचा हुकूम देतो. सत्यवती प्रवेश करून चंडवर्म्यास असल्या या अमानुष कृतीपासून परावृत्त होण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारांनीं विनविते व उपदेश करते, पण असुरीलालसेला बळी पडलेला चंडवर्मा तिच्यावरच उलट संतापून तिला निघून जाण्याची आज्ञा करतो.

### पद्य २१ वें.

सख्या:–

गावो रिझावो देखो । नाचो सुंदरिया नाचो ॥ होवे तो जग गुल्लाला । ऐसे नाचो ठुमक ठुमक ॥ है जुलफ् मुष्की मेरी । और कमर निराली मेरी ॥ हां हां रे हां हां । छुमे थै थै थै थै थया ॥ तुतुक धीर धिमीतक नग नग थूं थूं तरंग थो । ताता तरंग धिगीतग तरंग ता तरंग तरंग धीगीतग थै ॥ भो राज काज आज साज । भवन भवन छैया जग फुलवारी । अब गुलशन मारी । सबफूल एक एक पर पेरो ॥ धृ० ॥

---

### पद्य २२ वें.

सत्यवती:–

जनीं स्त्री जव प्रसन्न । तव गमते सौख्यखाणी ॥ तीच कपटी मन करितां मरणनिशाणी ॥ समरसमयीं अनुकूला । तीच ठार दशरथा करी ॥ अडवूनी वरदानीं । कैकयी अभिमानी ॥

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळ–चंद्रिकेचें घर.

चंद्रिकेच्या घरीं जाण्याचें उघड मार्ग खुंटल्यामुळें मुर्खोजीराव पार्सल बनून तिच्या घरीं येतो, त्याच्या मूर्खपणाला साधारण उपायानें आळा बसत नाहीं असें पाहून चंद्रराव पुत्रधर्माचें थोडेसें उल्लंघन करून एकदम भूताच्या वेषानें त्याच्यापुढें दत्त म्हणून उभा राहतो. भेदरून गेलेल्या मुर्खोजीकडून चंद्रिकेच्या घरीं पुन्हा न येण्याबद्दल शपथ घेऊन तो त्याला सोडून देतो. चंद्रराव व सांवळ्या सम्राट रणधीर महाराजांच्या सुटकेचा कांहीं प्रयत्न करतां आल्यास पहावा म्हणून तदुद्देशार्थ बाहेर पडतात.

### पद्य २३ वें.

चंद्रिका:–

हाय कैसें विरहा प्रियाच्या सहावे ॥ धृ० ॥ हृदी आराम ना । कांहीं सूचत ना ॥ बाई सुखवी न कांहीं मना या ॥ धृ० । जलीही स्थानीही दशदिशांना । सर्वत्रही भासे हा । पहावें रूप जेही मानसीं तें हो तापद कीं ॥ मना या दाह हा नच साहवे अंतर दहते गे । जें सुखास्तव वसत हृदयीं प्रेम पाही त्रासवीतें गे ॥ भेटेना आज जरी । जाती मम प्राण तरी काय करूं पाहूं कुठें । शोकानें धीर सुटे ॥ आस होती ही जिनें आजवरी सौख्य दिलें ॥ अजि मम तीही सखी हाय । जाते जाते ॥ आड पुर्वील संचित आलें ॥ धृ० ॥ काय आड पुर्वील संचित आलें ॥ धृ० ॥

---

## पद्य २४ वें.

**चंद्रराव:**–

मन्नेत्र मोही । नव बालिके तूं ॥ जीवनासी आधार । प्रेमा तवची गे ॥ हृदयीं वसतसे तव प्रेममूर्ती ॥ धृ० ॥ व्याकूल होई मन बावरें हें । सोडी निष्ठुर मौन ॥ धृ० ॥

---

## पद्य २५ वें.

**चंद्रिका:**–

अहा प्रेमा नसे अंतपार ।
(स्वगत) असे ना वेड्या या कैसा विचार ॥

**मूर्खोजी:**–

तूही मम होई सखी जीवाधार । सुंदरी मम होई ॥
विवाह करोनी । सुखी होईन मी ॥

**चंद्रिका:**–

मज ना असे दु:खभार । हृदीं कष्ट आम्हीं प्रेमेंची राहूं । प्रेमेची बोलूं । प्रेमेची नांदूं । आम्हीं सुखात नाथ ॥

**मूर्खोजीराव:**–

मज तैसेचि वाटें । आनंद दाटे ॥ ठेवीन सुखें मी प्रिया गृहांत । झणि चल झणि चल झणि चल जाऊं ॥

**चंद्रिका:**–

विवाही सौख्य हो फार ॥ धृ० ॥

---

## प्रवेश चवथा.

### स्थळ—रणमैदान.

पतीविरहामुळें उदासीन झालेली ललित मुलासह रणमैदानांत भटकत असतां प्रताप रणधीराचें पत्र तिच्या हातीं देतो, तें वाचून अगोदरच त्रस्त झालेली ललित ज्यास्तच क्रोधायमान होते, व क्रोधाच्या भरांत प्रतापालाच वाटेल तशी दूषणें देते, व त्याची अत्यंत कठोर शब्दांनीं निर्भत्सना करून क्रोधावेषांत झोंपीं गेलेल्या अनंगाला न घेतां निघून जाते. एक सैनिक येऊन रणधीर महाराज जिवंत असून चंडवर्म्याच्या कारागृहात असल्याची बातमी प्रतापास देतो, उत्साही झालेला प्रताप त्याला सोडवून आणण्याची प्रतिज्ञा करून आवेशानें निघून जातो, इतक्यांत रस्ता चुकलेले चंडवर्म्याचें दोन सैनीक सहज झोंपीं गेलेल्या अनंगाला पाहून बक्षिसाच्या आशेनें त्याला उचलून नेतात, इतक्यांत पुत्रशोध करीत करीत ललित तेथें येऊन अनंगाचा शोध करतें. व तो नाहींसा झालेला पाहून पतीविरहाच्या पेटलेल्या अग्नींत हें घृतसिंचन झाल्याप्रमाणें तिचा शोकाग्नी जास्तच भडकतो.

### पद्य २६ वें.

**ललितः—**

भास मुळीं जग हें न साचें । भासविते प्रतिभास मज खास भ्रमाचे ॥
थोर वंशीं मम सुखद कांत गेले इह लोक त्यजुनीच नशीब कैसें ॥ धृ० ॥

### पद्य २७ वें.

**ललितः—**

दाही बहू कोप पाही । उपजे वचनी जो ॥ हृदयासी भेदोनी । अति दुखवी मज ॥ धृ० ॥ पतिभक्त राज्ञी ही शापीत तुज क्रोधे । जाशील नरकी घोर । कलकाल तो प्रभू । अखिलही पाहे । या पापें बहु हाल होतील तबरे ॥धृ०॥ नच मानी तुज नाथ । पीववीन विष बाला त्यागीन हा लोक जाणे स्वमनीं रे ॥ धृ० ॥

## प्रवेश पांचवा.

स्थळ–रस्ता.

सम्राट रणधीराला मुक्त करण्याच्या निश्चयानें प्रताप येतो, इतक्यांत त्याच उद्देशानें एखाद्या शूर मनुष्याच्या मदतीची अपेक्षा करीत सांवळ्या व चंद्रराव प्रवेश करतात, त्यांचे संभाषण ऐकून प्रताप त्यांना मदत करण्याचें आश्वासन देतो, व ते पुढील योजना करण्याकरितां निघून जातात.

---

## प्रवेश सहावा.

स्थळ--तुरुंग.

रणधिराला ठेविलेल्या बंदिखान्याबाहेर दोन पहारेकरी पहारा करतां करतां झोंपेच्या गुंगीत आहेत. मुर्खोजीराव येऊन त्यांना उठवितो व ते तिघेही दारू वगैरे पिऊन झिंगले आहेत इतक्यांत सांवळ्या आपल्या भावाला स्त्रीवेषांत घेऊन येतो. त्याला पाहून ते तिघेही उल्लू होतात व तो आपल्या गायननर्तनानें खूष करून त्यांना यथेच्छ दारू पाजतों. शेवटीं त्यांनाच खोड्यांत अडकवून ठेवून तो आड लपून राहिलेल्या प्रतापाला व चंद्ररावाला बोलावितो, प्रताप रणधीराला व चंद्रराव मुर्खोजीला सोडवून घेऊन जातात.

### पद्य २८ वें.

**मूर्खोजी:–**

मेरी जानी शराब । अरगवानी शराब । आजा तुझे डालु पेटमे ॥ जी मेरा आया है तेरी लपेटमे ॥धृ०॥ गोले पासिंदे मंगाके पलेटमें । तुजकु पिऊंगा लिमलेटमें ॥ यारो खतां माफ करो मै नशेमें हूं । शीशेमें मै और मैमे नशा । मैं नशेमें हूं ॥ हूं कहत मुर्खोजीराव सुनो मेरे भाई । तुम बेचके घर पी जाव न हो घर पाई ॥ चुको न यारो आलमेटमें ॥ धृ० ॥

---

पद्य २९ वें.

सांवळ्या:—

छैला ना दो मोहे गारी। मय नाजो पाली। मय फुलनन किसी डारीरे। मयना जो पाली॥ छेड छाड को बनमे ढूंडो। हारे कोई मतवारी रे। मयना जो पाली॥ धृ०॥

पद्य ३० वें.

सांवळ्या:—

पनीया भरनको मै कैसे प्यारी जाऊं। पैया पडत हु छांड आचरवा॥ ढीट लंगर बापे बलहारी जाऊं॥ रोकोन मोहे। पीच डगरवा। शाममुरारी तोपे वारी वारी जाऊं॥ धृ०॥

## प्रवेश सातवा.

स्थळ—मुर्खोजींचें घर.

तुरुंगात घडलेल्या प्रकाराचा विचार करीत मुर्खोजी घरीं बसलेला असतो, इतक्यांत चंद्रराव परसोजीरावाच्या वेषानें येऊन चंद्रिकेचें म्हणून एक बनावट पत्र त्याला देतो, वृद्ध मुर्खोजी त्यात लिहील्याप्रमाणें धोब्याच्या वेषांत चंद्रिकेच्या घरीं जावयाचें ठरवितो, व ते दोघे निघून जातात. इतक्यांत मुर्खोजीरावाची वेडसर पत्नी वेडाताई सांवळ्याच्या वियावणीवरून चंद्रिकेनें आपल्या नवऱ्याला भुरळ पाडली असें समजून 'तिची चांगली खेटरानीं पूजा करावयास' तिच्या घरीं जावयास निघते सांवळ्या सोबत असतोच.

# प्रवेश आठवा.

स्थळ—तंबू.

चंडवर्मा झोंपेंत बडबडत आहे असा प्रवेश—सत्यवती लपत लपत राष्ट्राच्या—प्रजेच्या हिताकरितां चंडवर्म्यांचा प्रत्यक्ष आपल्या पतीचा खून करण्यासाठीं येतें, इतक्यांत प्रताप अकस्मात येऊन तिचा वरच्यावर हात धरतो. शेंवटीं या कलीला नाहींसा करण्याचें काम बिनबोभाट पार पाडण्याचें प्रतापावर सोंपवून ती निघून जातें, पण प्रताप आपल्या शौर्याला डाग लागेल असें खूनासारखें कृत्य न करतां चंडवर्म्याला जागा करून चार उपदेशाच्या गोष्टी सांगतो, पण ते बधीरापुढें गायन ? इतक्यांत चंडवर्म्याच्या भाषणांत 'मेलो ठार झाला' असें उद्गार ऐकून सत्यवती धांवून येते; तिच्या भाषणावरुन हीच आपल्या खुनाच्या प्रयत्नांत होती अशी चंडवर्म्याची खात्री होऊन तो तिला देहांत प्रायःश्चित्त देण्यासाठीं नौकरांना हुकूम देतो, व आपल्याला जीवदान दिल्याबद्दल प्रतापाचे आभार मानून त्याला आपली तरवार नजर करतो. प्रताप जाणार इतक्यांत दोघे पहारेकरी अनंगाला आणून हजर करतात. शेवटीं अनंगाला त्यांच्यापासून काढून घेऊन प्रताप निघून जातो, प्रताप अनंगाला घेऊन नदीच्या पलीकडे जाताच एकाएकी वीज पडून पूल मध्येंच मोडून पडतो.

## अंक दुसरा समाप्त

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

स्थल—ललितेचा महाल.

पतिवियोगाच्या असह्य दुःखानें भ्रमिष्ट बनलेली ललिता मंचकावर पडली आहे व सख्या तिची शुश्रूषा करीत आहेत, रणधीर प्रवेश करून तिच्या प्रकृतीविषयीं विचारपूस करीत आहे, इतक्यांत रक्तानें न्हालेला प्रताप अनंगाला घेऊन प्रवेश करतो, भ्रमिष्ट ललिता आपल्या पतीला व कुमाराला न ओळखतां त्या त्यांच्या छाया आहेत असं समजून 'आग आग' म्हणत निघून जाते. व थोड्याच वेळांत पेटलेल्या मशाली घेऊन परत येते आणि भ्रमिष्टपणाच्या लहरींत ती स्वतःला भाजून घेऊं पहाते, पण तितक्यांत रणधीर तिचा हात धरतो, ती निघून जाते व सर्वजण तिच्या मागोमाग जातात.

पद्य ३१ वें.

**सख्याः**—

मन धीर धरी प्रिय राज्ञी । ही धीर धरी प्रिय राज्ञी ॥ धृ० ॥ रात्रंदीन ध्यान प्रिया स्मरणीं ॥ शोकानें विव्हल होसी । प्रेमानें व्याकुल होसी । तुज चैन नसे प्रिय राज्ञी ॥धृ०॥ सहवेना दुःख तुज बाई । श्रमीत हृदय होई ॥ विरहव्यथा ही तुज छळे बाई । हृदयीं धरीं तूं धीर ॥ धृ० ॥

---

पद्य ३२ वें.

**सख्याः**—

हे देवी, करी गे कृपाही, सुविचारी अविकारी धीर धरी गे । शांत चित्त होई । धीर धरी बाई । करीत विनती ही ॥ धृ० ॥

---

### पद्य ३३ वें.

ललितः—

तुज कवणें ही रीत शिकविली । पहा प्रिया मम शुद्धि हरपविली ॥बोल॥ आस नाहीं जाळी या हृदया पती हिन सती अती दुर्गती ॥ धृ० ॥ तन मन धन हें करित स्मरण तव । निशिदिनी पलपल क्षणक्षण हें मम ॥बोल॥ कुढत कढत हृदयीं दुःखें आतां घडत केंवि मज ते सुख दर्शन ॥ धृ० ॥

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—चंद्रिकेचें घर.

चंद्रिकेनेंच आपल्या वृद्ध पतीला भुरळ पाडली अशा गैर समजूतीनें व सांवळ्याच्या शिकवणीनें वेडाताई तिच्या घरीं येतें, पण चंद्रराव दोघींची समजूत घालतो. इतक्यांत महाराच्या वेषांत मुर्खोजीराव प्रवेश करतो. सांवळ्या व चंद्रिका त्याची बरीच थट्टा करून जातात, व पुन्हा चंद्रराव चंद्रिकेच्या वेषानें येतो, मूर्ख मुर्खोजी त्यालाच चंद्रिका समजून त्याच्याशी थट्टा मस्करी करतो, पण चंद्रराव शेवटीं आपला वेष काढून टाकतो व शेवटीं या तात्पुरत्या चंद्ररावाच्या कपटनाटकाचा, मुर्खोजीरावाच्या मुर्खपणाचा व वेडाताईच्या वेडगळ समजूतीचा व सांवळ्याच्या वात्रटपणाचा शेवटचा प्रवेश खलास होतो.

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळ—रणमैदान.

प्रतापाच्या शौर्यानें चकीत झालेला चंडवर्मा प्रवेश करतो, इतक्यांत शत्रू सैन्याच्या प्रखर माऱ्यामुळें सैरावैरा पळत सुटलेल्या सैनिकापैकीं एक चंडवर्म्याला पराजयाची बातमी देतो. क्रोधभरानें चंडवर्मा समोरुन येणाऱ्या रणधीराला पाहून त्याला द्वंद्वाला आव्हान करतो, दोघांचे युद्ध होऊन चंडवर्मा रणधीराला पाडून आपल्या शिपायाकडून ठार करविणार इतक्यांत एक पिशाच्च येऊन त्या शिपायाला मारतें, चंडवर्मा आपल्या पत्नीचें पिशाच्च पाहून त्याला ठार करणार इतक्यांत प्रताप शेजारील चंड-

र्म्याच्या शिपायाला गोळी घालून ठार करतो, संतप्त झालेल्या चंडवर्म्याचें व प्रतापचें द्वंद्व होते व चंडवर्म्याची तरवार मोडून पडते, पिशाश्चरुपानें आलेली सत्यवती व रणधीर चंडवर्म्याला जीवदान देण्याकरितां प्रतापाची प्रार्थना करतात व पश्चात्तापानें पावन झालेला चंडवर्मा सत्यवतीची व रणधीराची क्षमा मागून रणधीराला राज्याभिषेक करण्याचें जाहीर करतो.

---

## प्रवेश चवथा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ९८५९३

स्थल—दरबार.

नृत्यगायन होऊन चंडवर्मा स्वहस्तानें रणधीराला राज्याभिषेक करतो व ललिताही प्रतापाची क्षमा मागून त्याला नजराणा अर्पण करते व आनंदीआनंद व नृत्य गायन झाल्यानंतर दरबार बरखास्त होतो.

### पद्य ३४ वें.

ललितः—

हे वीर बंधो स्विकरी अहेर मानी । क्षमा मागे मी तवही । केले बहु अपराध तव म्या नाणी कोप मानी ॥ धृ० ॥ क्रोध करी न बंधो विनती ही चरणी । देवो ईश चिरायू तुजला हे वीरबंधो ॥ धृ० ॥ स्त्रीस्वभावें दुरुत्तरें जी बोलले विसरोनी ती । दयालुत्व सुवीराचें ब्रीद हें तूं जाणसी ॥ धृ० ॥

### कोरस.

जय दीना नाथा गौरी शंकरा । पायीं वंदन भव हरा ॥ वारा दुःखाचा वारा सुरवरा । सुखकरा त्राहि त्राहि नंदिकेश्वरा ॥ तारा झणिं थारा सौख्य शिखरा द्या अम्हां भक्ति अपारा उदारा ॥ पसरा प्रेम नजर प्रखर नकरा देश सुखवुनि क्लेश जिवांचे निवारा ॥ दुर्जन मर्दन, सज्जन अर्जन, मुनिजन रक्षण, किल्मिष निर्सन, भवजल शोषण, घन कण निर्मुन, सुखयुत जनवन हो झणिं प्रभुवरा ॥ जय ॥

समाप्त



REFBK-0019513
REFBK-0019513

To Witness the World's

**BEST MOTION PICTURES**

In One of the World's

**BEST CINEMA THEATRES**

Visit NONE but the

# LAKSHMI CINEMA

(Near Reay Market — Poona City)

---

OUR ANOTHER CITY BRANCH IS

## APOLLO CINEMA

(Rasta's Peth — Poona City)

**UNIVERSAL PICTURES ARE OUR SPECIALITY.**

---

दीड लाखांवर खर्च करून सर्वांगसुंदर बनविलेलें, अधुनिक सुखसोयींचें

आगर–उत्कृष्ट चित्रपटांचें प्रदर्शनगृह

# लक्ष्मी सिनेमा

रे मार्केटजवळ–शुक्रवार पेठ, पुणें शहर.

---

पुणें शहरांतील आमचे दुसरे सिनेमागृह

# अपॉलो सिनेमा

रास्ता पेठ, पुणें शहर.

युनिव्हर्सल, व्हिटाग्राफ वगैरे कंपनीची रहस्यमय सीरियल्स–जुवेल, ब्लूबर्ड, बटरफ्लाय वगैरे कंपनींचे सर्वोत्कृष्ट चित्रपट–सेंचरी–रेनबो, स्टार वगैरे प्रसिद्ध कंपनीचे हास्यकारक चित्रपट आपणास वरील दोन सिनेमागृहांतच पहावयास मिळतील.